**MHBI150010082014**

## नियमीत दिवाणी दावा क्रमांक ४०८/२०१४ मधील निशाणी क्रमांक ३७ खालील आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २६, नियम ९ अन्वये न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करणेसाठी दाखल केलेला आहे.

२) अर्जाप्रमाणे दावा मिळकती हया वादीने त्याच्या भावाविरुध्द दाखल केलेल्या नियमीत दिवाणी दावा क्र.१५/२००४ मधील हुकूमनाम्याची अंमलबजावणीसाठी दाखल केलेल्या नियमीत दरखास्त क्र. ०१/२०१२ च्या कार्यवाहीदरम्यांन दिनांक ०७/०३/२०१४ रोजी पोलिस संरक्षणामध्ये निमतानदार भुमिअभिलेख, पाटोदा यांच्या मार्फत मोजणी झालेली आहे. मात्र त्याच्या ताब्यात आलेल्या दावा मिळकतीपैकी काही भागाच्या खोटया चतुःसिमा नमुद करुन त्याचा भाऊ सय्यद यासीन सय्यद कमालुद्दीन याने प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२ यांना काही क्षेत्र विक्री केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ आणि २ वादीच्या दाव्या मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करीत आहेत. तसेच प्रतिवादी क्र.२ च्या खरेदीखतात नमुद क्षेत्र दावा मिळकतीपैकीचे नसल्याबाबतचे कथन ते करत आहेत. म्हणजेच प्रस्तुतच्या दाव्यात चतुःसिमेचा वाद निर्माण झालेला आहे. अशा परिस्थितीत तालुका निरीक्षक भुमीअभिलेख, पाटोदा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करुन त्यांना नियमीत दिवाणी दावा क्र.१५/२००४ मधील हुकूमनाम्याप्रमाणे दिनांक ०७/०३/२०१४ रोजी झालेल्या मोजणीनुषंगे वादीच्या हिश्यास आलेल्या क्षेत्राची मोजणी करुन नकाशा तयार करुन त्यात त्याचे क्षेत्र दर्शविण्याबाबत, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी खरेदी केलेले क्षेत्र निश्चीत कोठे येते ते वेगळया रंगात दर्शविण्याबाबत आणि प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीच्या क्षेत्रावर अतिक्रमण केले असलेस त्यांनी किती अतिक्रमण केले आहे ते दर्शविण्याबाबत आदेशीत करण्याची मागणी केली.

३) अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करत प्रतिवादींनी अर्जास तीव्र हरकत नोंदविली. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे फक्त आणि फक्त प्रकरण लांबविण्यासाठी वादीने प्रस्तुत अर्ज दिलेला आहे. न्यायालयनी आयुक्त नेमण्याची

आवश्यकता नसल्याचे सांगत, शेवटी त्याने अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली.

४) अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

५) दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. वादीच्या वतीने सादर करण्यात आलेल्या मा. बॉम्बे उच्च न्यायालयाच्या मल्हार, हरिश्चंद्र व राजु वि. शिवाजी[1] आणि काशिनाथ चिंधुजी शास्त्री वि. हरीभाऊ नाथुजी बावाथ[2] इत्यादी न्यायनिवाडयांचे अवलोकन करण्यात आले.

६) पुढे जाण्यापूर्वी प्रस्तुतच्या दाव्यातील अभिलेखाचे अवलोकन करणे गरजेचे ठरते. अभिलेखाच्या अवलोकनावरुन वादीने प्रस्तुतचा दावा हा निरंतरच्या मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. वादीच्या दाव्याप्रमाणे दावा मिळकत ही त्याच्या ताब्यात नियमीत दरखास्त क्र. ०१/२०१२ च्या कार्यवाहीत दिनांक ०७/०३/२०१४ रोजी पोलिस संरक्षणात निमतानदार भुमि अभिलेख, पाटोदा यांच्या उपस्थितीत मंडळ अधिकारी, पाटोदा यांनी पंचनामा करुन दिलेला आहे. याप्रमाणे तो दावा मिळकतीच्या ताब्यात असताना देखील त्याचा भाऊ सय्यद यासीनने दावा मिळकतीच्या खोटया चतुःसिमा दर्शवुन दिनांक २९/०८/२०१२ रोजी आणि दिनांक ०७/०२/२०१४ रोजी अनुक्रमे प्रतिवादी क्र.१ व २ यांना विक्री केले. त्यामुळे प्रतिवादी हे दावा मिळकतीवरील त्याच्या कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करीत आहेत. त्यामुळे त्याने प्रस्तुत अर्ज वरनमुद मागणीसह सादर केलेला आहे.

७) यात काहीएक शंका नाही की, प्रतिवादींनी दाव्यात हजर होऊन वादीच्या दाव्यातील सर्व कथने नाकारत, त्यांनी सय्यद यासिन यांच्याकडुन खरेदी केलेले क्षेत्र दावा मिळकतींदरम्यांन येत असल्याचे नाकारलेले आहे.

८) प्रस्तुत दावा हा वादीने प्रतिवादींना त्याच्या दावा मिळकतीवरील कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करण्यासाठीच्या निरंतरच्या मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. वादीच्याच दाव्याप्रमाणे त्यास दावा मिळकतीचा ताबा हा नियमीत दरखास्त क. ०१/२०१२ च्या कार्यवाहीदरम्यांन मोजणी करुन दिनांक

---

1 2014 (4) Mh.L.J. 237.
2 2004 (2) Mh.L.J. 722.

०७/०३/२०१४ रोजी देण्यात आलेला आहे. दाव्यात नमुद प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या हक्कात यासीन सय्यद यांनी करुन दिलेले खरेदीखत हे अनुक्रमे दिनांक २९/०८/२०१२ आणि ०७/०२/२०१४ रोजीचे आहेत. म्हणजेच त्यांचे खरेदीखत झाल्यानंतर वादीस दावा मिळकत मोजणी करुन त्याच्या ताब्यात दिलेली आहे. अशा परिस्थितीत परत मोजणी करुन वादीस काय साध्य करावयाचे आहे ते स्पष्ट होत नाही.

९) पक्षकारांनी दाव्यात दाव्याच्या निर्णयास अपेक्षीत मुद्दयाला अनुसरुन पुरावा देणे अपेक्षीत आहे. निरंतरच्या मनाई हुकूमाच्या दाव्यात वादीने दावा मिळकतीवरील त्याच्या ताब्यास अनुसरुन, ताब्यास करण्यात आलेल्या हरकतीनुषंगे पुरावा देणे गरजेचे आहे. दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कुठली मालमत्ता विकत घेतली आहे किंवा त्यांच्या खरेदीखतात काय नमुद आहे, याच्याशी त्याला काहीएक घेणे नाही. पुढे जाऊन दाव्यात वादीचे कुठेही प्रतिवादींनी दावा मिळकतीवर अतिक्रमण केल्याचे कथन किंवा अतिक्रमण दुर करुन ताबा मिळणेबाबतची मागणी करण्यात आलेली नाही. अशा परिस्थितीत अर्जात वादींच्या वतीने करण्यात आलेल्या मागण्यांचा विचार करता, त्यातुन प्रस्तुत दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयापावेतो पोहोचण्यासाठी आवश्यक अशा कुठल्याही मुद्दयावर पुरावा उपलब्ध होऊ शकत नाही.

१०) मा. बॉम्बे उच्च न्यायालयाने मल्हार, हरिश्चंद्र व राजु वि. शिवाजी[3] मध्ये पारीत केलेल्या न्यायनिवाडयातील परिस्थितीचा विचार करता, त्यात मोजणी ही प्रथमतःच होत होती. मात्र प्रस्तुत दाव्याकामी प्रतिवादी क्र.१ आणि २ च्या हक्कात खरेदीखत झाल्यानंतर दावा मिळकत ही वादीच्या ताब्यात मोजणीअंती देण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीत दावा मिळकतीत प्रतिवादींनी अतिक्रमण केल्याबाबतचे कुठलेही कथन दाव्यात नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यातील विशीष्ट अशा तथ्य आणि परिस्थितीचा विचार करता, वरनमुद न्यायनिवाडा याठिकाणी लागु पडत नाही.

११) मा. बॉम्बे उच्च न्यायालयाच्या काशिनाथ चिंधुजी शास्त्री वि.

---

[3] Supra Note 1.

हरीभाऊ नाथुजी बावाथ[4] मधील मुळ दावा हा मुळतः अतिक्रमण काढुन दावा मिळकतीचा ताबा मिळण्यासाठी दाखल केला होता. त्यामुळे प्रस्तुत न्यायनिर्णय देखील दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता, याठिकाणी लागु पडत नाही. त्यामुळे एकुणच प्रस्तुतच्या दाव्यात विवादीत करण्यात आलेल्या तथ्यानुषंगे आणि एकुणच वरनमुद कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**-:आदेश:-**

१) निशाणी क्रमांक ३७ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२) प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च वादीने सोसावा.

(पंकज म. बिदादा)

दिनांकः- १४/०१/२०१९. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पाटोदा.

---

4 Supra Note 2.